दिनांक १३ ते १७ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत चेन्नई, तामिळनाडू येथे आयोजित अखिल भारतीय नागरी सेवा कॅरम स्पर्धा (२०१७-१८) मध्ये महाराष्ट्राचा संघ सहभागी होण्यासाठी होणाऱ्या खर्चास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक- अभानासे- ३८१८ /प्र.क्र.१४/क्रीयुसे-२,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- ०५ मार्च, २०१८.

वाचा :- (१) केंद्रीय नागरी सेवा, सांस्कृतिक कार्य आणि क्रीडा मंडळ यांचे पत्र क्रमांक- ५९/०२/२०१७-१८ /सीसीएससीएसबी; दिनांक ०८.०१.२०१८.
(२) सचिवालय जिमखान्याचे पत्र क्र.-अभानासे/ कॅरम /२०१७-१८, दि.०७.०२.२०१८.
(३) उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई विभाग, मुंबई यांचे पत्र क्रमांक-उपसंक्री/अभानासे/ १७-१८/का-४/२८२, दि.०८.०२.२०१८.

: शासन निर्णय:

दिनांक १३ ते १७ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत जवाहरलाल नेहरु इंडोअर स्टेडियम **चेन्नई, तामिळनाडू** येथे आयोजित करण्यात आलेल्या **अखिल भारतीय नागरी सेवा कॅरम स्पर्धा २०१७-१८** मध्ये भाग घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा संघ निवडण्याकरिता सचिवालय जिमखाना, मुंबई येथे दि. ३०.०१.२०१८ रोजी निवड चाचणी आयोजित करण्यात आली होती. या चाचणीमध्ये सहभागी झालेल्या ४० अधिकारी व कर्मचाऱ्यांची यादी सोबतच्या विवरणपत्र "क" प्रमाणे तर निवड चाचणीद्वारे निवडण्यात आलेला राज्याचा संघ विवरणपत्र "अ" प्रमाणे आहे. सदर स्पर्धेची निवड चाचणी, प्रशिक्षण शिबीर तसेच राज्य संघाच्या सदर स्पर्धेतील सहभागासाठी विवरणपत्र "ब" प्रमाणे **रु.५२,७००/-(रुपये बावन्न हजार सातशे फक्त फक्त)** इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

२. उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई विभाग, मुंबई यांना सदर रक्कम आहरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. संघातील ज्या खेळाडूंना किट बॅग्ज व ट्रॅकसूट मिळालेले आहेत ते खेळाडू कोणत्याही अखिल भारतीय नागरी सेवा क्रीडा स्पर्धेसाठी किटबॅग व ट्रॅकसूट दोन वर्षातून एकदा मिळण्यास पात्र ठरतील. या नियमाचे सचिवालय जिमखान्याने काटेकोरपणे पालन करावे.

४. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी संबंधित विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी खेळाडू प्रशिक्षक / व्यवस्थापक यांना दिनांक ०८.०२.२०१८ (म.नं.) पासून कार्यमुक्त करावे. तसेच या खेळाडूंच्या सेवा दिनांक ०९.०२.२०१८ ते ११.०२.२०१८ या कालावधीतील प्रशिक्षण शिबिरासाठी सचिवालय जिमखान्यात उपलब्ध करून देण्यात याव्यात. सदर स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खेळाडूंना ११.०२.२०१८ रोजी मुख्यालय सोडण्यास परवानगी देण्यात यावी. तसेच खेळाडूंनी दिनांक १३.०२.२०१८ ते १७.०२.२०१८ या कालावधीतील स्पर्धेत उपस्थित राहावे. संघातील प्रत्येक खेळाडूने व व्यवस्थापकाने ते ज्यांच्या अधिपत्याखाली काम करीत असतील त्या विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांची परवानगी मिळविणे आवश्यक आहे.

५. संघातील खेळाडू, प्रशिक्षक व व्यवस्थापक यांची प्रशिक्षण शिबीर व स्पर्धा काळातील कार्यालयीन अनुपस्थिती ही शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-एलव्हीई-१४८५/प्र.क्र.८३३/ अ/सेवा-९, दिनांक ११ मे, १९८९ व क्रमांक-एलव्हीई/१४९२/४६/सेवा-९, दिनांक ३० जुलै, १९९२ अन्वये "कर्तव्य कालावधी" म्हणून समजण्यात यावा. तसेच स्पर्धा संपल्यानंतर एक दिवसानंतर खेळाडूंनी मुख्यालयास परत यावे. या सर्वाचा प्रवास भत्ता, दैनिक भत्ता व इतर भत्ते यावर होणारा खर्च संबंधित विभागाच्या / कार्यालय प्रमुखांच्या मुख्य लेखाशिर्षाखाली असणा-या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. स्पर्धेच्या निवड चाचणीसाठी उपस्थित अधिकारी / कर्मचारी (विवरणपत्र-क) यांची कार्यालयीन अनुपस्थिती शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-एलव्हीई/१४९२/४६/सेवा-९, दिनांक ३० जुलै,१९९२ अन्वये कर्तव्यार्थ म्हणून समजण्यात यावी व मुंबई बाहेरील खेळाडूंना अनुज्ञेय असलेला प्रवास / दैनिक भत्ता व इतर सवलती या वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक- एलव्हीई-१४८५/प्र.क्र.८३३/अ/सेवा-९, दिनांक ११ मे, १९८९ व वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक-एलव्हीई-१४०४/प्र.क्र.८/अ/सेवा-८, दिनांक २७ फेब्रुवारी, २००४ अन्वये विशेष बाब म्हणून मंजूर करण्यात यावी.

या सवलतीचा लाभ मिळण्यासाठी निवड चाचणीसाठी उपस्थिती असणा-या अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबत मानद सचिव, सचिवालय जिमखाना यांनी दिलेले प्रमाणपत्र संबंधित कर्मचा-यांनी त्यांच्या आस्थापना कार्यासनाला सादर करणे आवश्यक राहिल.

७. सचिवालय जिमखान्याने प्रत्यक्ष खर्चाचे विवरणपत्र कोणत्याही परिस्थितीत आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई विभाग, मुंबई यांना स्पर्धेत केलेल्या खर्चाच्या अहवालासोबत सादर करावे. तसेच जर रक्कम शिल्लक राहिली तर ती उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई विभाग, मुंबई यांना त्वरीत परत करण्यात यावी.

८. यासाठी होणारा खर्च सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी "२२०४ क्रीडा व युवक सेवा, १०४ क्रीडा व खेळ, (०६) अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धा, (०६)(०२) अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेत सहभाग (२२०४ १९८१), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पित तरतूदीतून भागविण्यात यावा.

९. सचिवालय जिमखाना यांच्याकडून स्पर्धेचा अहवाल, बाबनिहाय प्रत्यक्ष झालेल्या खर्चाचा तपशील, विनियोग प्रमाणपत्र, परिक्षित लेखा विवरणपत्र व मंजूरी आदेशातील सर्व अटींची पूर्तता करण्याच्या अटीवर विवरणपत्र "ब" प्रमाणे खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०६१०३००४२५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca2802 67c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.06 10:31:32 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे विभाग, पुणे
३. उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई विभाग, मुंबई,
४. जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई-४०० ०२१.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
७. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
८. वित्त विभाग (व्यय-११), मंत्रालय, मुंबई.
९. मानद महासचिव, सचिवालय जिमखाना, मुंबई-४०० ०३२ (५ प्रती)
१०.संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे कार्यालये (सचिवालय जिमखान्यामार्फत)
११. निवड नस्ती (क्रीयुसे-२).

विवरणपत्र "अ"

१३ ते १७ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत जवाहरलाल नेहरु इंडोअर स्टेडियम, चेन्नई येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धा कॅरम २०१७-१८ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या कॅरम संघाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या स्पर्धकांची नावे दर्शविणारे विवरणपत्र.

क्र.	खेळाडूचे नाव व पदनाम	पुलओव्हर	किटबॅग	कार्यालय / विभागाचे नाव
१	राजेश धुमाळे वाहन चालक	नाही	नाही	कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, मुंबई उपगनर.
२	रजनीकांत पंडीत, सफाईगार	होय	होय	सर ज.जे. समूह रुग्णालय, भायखळा, मुंबई.
३	विजय दळवी, कक्षसेवक	होय	होय	अधीक्षक, आमदार निवास (सा.बां.) उपविभाग, मुंबई
४	भास्कर गवस,सहाय्यक	होय	होय	सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५	विजय बगरे, अधीक्षक	होय	होय	अधीक्षक अभियंता ,मुंबई) सा.बां (.मंडळ ,बांधकाम भवन ,२५ मर्झबान रोड ,फोर्ट ,मुंबई.
६	ज्ञानदेव आंबावले, कक्षसेवक	होय	होय	सर ज.जे. समूह रुग्णालय, भायखळा, मुंबई.
७	संजय वारंग, कक्ष अधिकारी	होय	होय	नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८	लक्ष्मण जादव, सफाईगार	होय	होय	सर ज.जे. समूह रुग्णालय, भायखळा, मुंबई.
९	प्रतिभा रांगणे, राज्यकर निरिक्षक	होय	होय	राज्यकर सह आयुक्त (प्रशासन) भाईन्दर.
१०	रंजना वाघमारे, वरिष्ठ स्वीय सहाय्यक	होय	होय	महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
११	कांचन मुरगुडकर, स्वीय सहाय्यक	नाही	नाही	विक्रीकर आयुक्त, विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई
१२	स्मिता राजे, विक्रीकर अधिकारी	नाही	नाही	विक्रीकर विभाग, विक्रीकर भवन, माझगाव, मुंबई.
१३	आश्विनी धामापूरकर, सांख्यिकी सहाय्यक	होय	होय	उपायुक्त (नियोजन) विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई.
१४	व्ही.व्ही. मेस्त्री, विक्रीकर निरिक्षक	होय	होय	राज्य सेवा कर, ठाणे विभाग, ठाणे.
१५	श्री. अशोक पाडावे व्यवस्थापक	होय	होय	सचिव, सचिवालय जिमखाना, मुंबई.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.06 10:33:05 +05'30'

(राजेंद्र पवार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

विवरणपत्र " ब"

१३ ते १७ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत जवाहरलाल नेहरु इंडोअर स्टेडियम, चेन्नई येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धा कॅरम २०१७-१८ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या कॅरम संघासाठी होणाऱ्या खर्चाचे विवरणपत्र.

क्र.	तपशील	रुपये
अ)	**निवड चाचणी पूर्व तयारीसाठी खर्च :-**	५००/-
ब)	**निवड चाचणी आयोजनाचा खर्च.**	
१)	कॅरम पावडर रु.२५०/- प्रतिकिलो प्रमाणे २ किलो.	५००/-
२)	पंचाना / पदाधिकारी वर्गाला चहा व अल्पोपहार यावरील खर्च.	१,५००/-
३)	१ मुख्य पंच व ३ सहाय्यक पंच यांना मानधन (१०००+(५००x३))	२,५००/-
५)	१० कॅरम बोर्डाचे स्टॅन्डसहित भाडे, (एक दिवसाकरिता) (रु. ३००/- प्रति कॅरम याप्रमाणे १० कॅरमचे भाडे (३००x१०x१)	३,०००/-
६)	वाहतूक खर्च (ने-आण, हमालीसह)	२,०००/-
ब) १)	**प्रशिक्षण शिबीर :** दिनांक ११ ते १५ जानेवारी, २०१७ या कालावधीत आयोजित केलेल्या प्रशिक्षण शिबीरासाठी ५ कॅरम स्टॅण्डसहित भाडे. (३ दिवसाकरिता)	३,५००/-
२)	वाहतूक खर्च (ने-आण, हमालीसह)	१,०००/-
३)	१४ खेळाडू व १ प्रशिक्षक यांना प्रशिक्षण कालावधीत अल्पोपहार. (१५x१००x३) (३ दिवसाकरिता)	२,५००/-
क)	**वैयक्तिक क्रीडा साहित्य:-**	
१)	१५ टि शर्टस् रु. ५००/- (मोनोग्रामसहित) प्रमाणे.	७,५००/-
२)	१५ ट्राऊझर रु. ५००/- प्रमाणे.	७,५००/-
३)	१२ पूल ओव्हर डिलक्स क्वॉलिटी रु.५००/- प्रमाणे.	६,०००/-
४)	१४ स्ट्रायकर्स रु.२५०/- प्रमाणे.	३,५००/-
५)	१५ नॅपकिन्स रु. ७५/- प्रमाणे.	१,१२५/-
६)	१५ बूट रु. ५००/- प्रमाणे.	७,५००/-
७)	१५ पायमोजे रु. ७५/- प्रमाणे.	१,१२५/-
८)	संकीर्ण खर्च	१,०००/-
९)	औषधे व प्रथमोपचाराकरिता खर्च.	४५०/-
	एकूण रुपये :- (रु. बावन्न हजार सातशे फक्त)	**५२,७००/-**

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.06 10:34:14 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

विवरणपत्र - क

१३ ते १७ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत जवाहरलाल नेहरु इंडोअर स्टेडियम, चेन्नई येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धा कॅरम २०१७-१८ मध्ये भाग घेणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या कॅरम संघाची निवड करण्यासाठी दि. ३० जानेवारी, २०१८ रोजी निवड चाचणीसाठी उपस्थित राहिलेले अधिकारी कर्मचारी खेळाडूंची नावे विवरणपत्र.

क्र.	खेळाडूचे नाव	पदनाम	विभाग / कार्यालय
१	भिकाजी वा. नागरे	विक्रीकर अधिकारी	विक्रीकर सहआयुक्त, नोडल ५, मुंबई, वस्तू व सेवा कर विभाग, मुंबई.
२	जितेंद्र द. चांदोरकर	क.प्र.स.	न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा, कालीना, मुंबई.
३	मंगेश ल. शेटे	मुद्रितशोधक	शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.
४	संजय ना. वारंग	कक्ष अधिकारी	नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५	गुरुनाथ द. हळदणकर	उदवाहक चालक	सर ज.जी. समूह रुग्णालय, भायखळा, मुंबई.
६	लक्ष्मण बा. यादव	सफाईगार	सर ज.जे. समूह रुग्णालय, भायखळा, मुंबई.
७	हि.सा. पेडणेकर	सहा. कक्ष अधिकारी	पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
८	ज.स. सोरटे	विक्रीकर निरिक्षक	विक्रीकर सहआयुक्त, नोडल -३, व्य.ले.प. शाखा, माझगाव, मुंबई - १०.
९	अरुण सोनावळे	नोटीस वाहक	राज्यकर सह आयुक्त, (व्हॅट/अेडिएम) ठाणे शहर विभाग, ठाणे.
१०	जयराम भ. जाधव	विक्रीकर निरिक्षक	राज्यकर सह आयुक्त, (व्हॅट/अेडिएम) ठाणे शहर विभाग, ठाणे.
११	जनार्दन ल. खामकर	क्षेत्र सहाय्यक	सहाय्यक नियंत्रक, वै.मा.शा. मुंबई जि.क्र.४, परेल, मुंबई.
१२	राजन भाटकर	रोखपाल	उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३	प्रफुल्ल ना. चिंचे	वाहन चालक	उपवनसंरक्षक, अमरावती वन विभाग, अमरावती कॅम्प, अमरावती.
१४	अनिल य. बनपट्टे	बांधणीकार	येरवडा कारागृह मुद्रणालय, येरवडा, पुणे.
१५	विजय कि. बगरे	अधीक्षक	अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) मंडळ, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई.
१६	विजय शंकर दळवी	कक्षसेवक	अधीक्षक, आमदार निवास (सा.बां.) उपविभाग, मुंबई
१७	दत्ताराम बापू लाड	वरिष्ठ लिपिक	पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय, (कक्ष-५ (विचौ), मुंबई.
१८	रविकांत घ. सतदेवे	कनिष्ठ लिपिक	पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय, (कक्ष-५ (विचौ), मुंबई.
१९	राजेश भ. धुमाळे	वाहन चालक	कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, कोकण भवन.
२०	ज्ञानदेव नु. आंबावले	कक्षसेवक	सर ज.जे. समूह रुग्णालय, भायखळा, मुंबई.
२१	रजनीकांत एन. पंडित	सफाईगार	सर ज.जे. समूह रुग्णालय, भायखळा, मुंबई.
२२	सचिन शां. चव्हाण	लिपिक टंकलेखक	सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३	प्रमोद रा. गवंडे	शिंपी	सर ज.जी. समूह रुग्णालय, भायखळा, मुंबई.

२४	समीर कावणकर	लिपिक टंकलेखक	अधिपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने, मुंबई.
२५	कुशाप्पा रेडेकर	वाहन चालक	भाषा संचालनालय, मुंबई.
२६	जगदीश भा. गांगुर्डे	सहा. कक्ष अधिकारी	उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
२७	भास्कर ग. गवस	सहाय्यक	सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२८	जावेद नाखवा	लिपिक टंकलेखक	सहकार व पणन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२९	श्रीम. रंजना वाघमारे	वरिष्ठ स्वीय सहाय्यक	महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३०	सौ. कांचन म. मुरगुडकर	स्वीय सहाय्यक	विक्रीकर आयुक्त, विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई
३१	कु. अश्विनी अ. बोरगे	कनिष्ठ लिपिक	मुळा पाटबंधारे विभाग, अहमदनगर.
३२	श्रीम. प्रतिभा दी. काकडे	लेखा अधिकारी	महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळ, बांद्रे (पू), मुंबई.
३३	श्रीम. प्रतिभा प्र. रांगणे	राज्यकर निरिक्षक	राज्यकर सह आयुक्त (प्रशासन) भाईन्दर.
३४	श्रीम. मंगल नाखवा	सहा. कक्ष अधिकारी	सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३५	सौ. व्ही.व्ही. मेस्त्री	विक्रीकर निरिक्षक	राज्य सेवा कर, ठाणे विभाग, ठाणे.
३६	श्रीम. अश्विनी धामापूरकर	सांख्यिकी सहा.	उपायुक्त (नियोजन) विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई.
३७	अनंत सावंत	अवर सचिव	सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
३८	राजेंद्र पवार	उपसचिव	शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
३९	सुहास चव्हाण	अवर सचिव	विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
४०	श्रीम. स्मिता राजे	राज्यकर अधिकारी	राज्यकर सह आयुक्त, विक्रीकर कायदा, उपनगरीय वस्तू व सेवा कर कायदा, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा, मुंबई.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.06 10:35:29 +05'30'

(राजेंद्र पवार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन